रत्नागिरीतही आता कर्करोग चिकित्सा शक्य!

कर्करोगाचा सामना प्राथमिक अवस्थेत करण्यासाठी महिलांमध्ये जागृती व्हावी : डॉ. कोपीकर

रत्नागिरी/प्रतिनिधी

कर्करोग प्राथमिक अवस्थेत असताना त्याचा सामना करण्यासाठी महिलावर्गाने सजग व्हावे. अन्य महिलांमध्ये जागृती निर्माण करावी, असे आवाहन जागतिक पातळीवर कॅन्सरवर काम करणारे तज्ज्ञ डॉ. चैतन्य कोपीकर यांनी केले आहे.

फिनोलेक्स इंडस्ट्रीज, मुकुल माधव फाऊंडेशन, पुण्याचे प्रशांती कॅन्सर केअर मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने रत्नागिरीत 'कर्करोग निदान अजूनही दूरी' हा अभिनव उपक्रम राबवण्यात येत आहे. १७ ते २० डिसेंबर या कालावधीत गोळप व परिसरातील महिलांसाठी आयोजित या कार्यक्रमाचे उद्घाटन चिरायू हॉस्पिटलच्या सर्वेसर्वा व स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सुनीता चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनीही कर्करोग प्राथमिक अवस्थेमध्ये असल्यास महिलांनी दक्षता बाळगल्यास या रोगाचा पूर्णपणे प्रतिबंध करता येतो, असे यावेळी सांगितले.

या कार्यक्रमाला डॉ. रमेश चव्हाण, मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रशांती केअर मिशनच्या संचालिका लालेह गुशेरी आपले तज्ज्ञ डॉक्टर, समुपदेशक आणि अद्ययावत तपासणीची उपकरणे असलेली व्हॅन घेऊन या शिबिरासाठी आले आहेत. सकाळी १० ते सायं. ५ या वेळेत गोळप येथील फिनोलेक्स कॉलनीमध्ये तसेच पंचक्रोशीतील गावांमध्ये जाऊन ही तपासणी केली जाणार आहे. कार्यक्रमात फिनोलेक्सच्या गोळप येथील कॉलनीच्या महिला मंडळाने महत्त्वाचा पुढाकार घेतला. यावेळी रक्षंदा अन्सारी, डॉ. ज्योती चव्हाण, संचालक एस.एस. मठ, ए.बी. अत्रे, तातुगडे, डॉ. आशुतोष मुळे, टी. के. काकडे, सागर चिवटे, गौरी क्षीरसागर, अभिषेक साळवी आदींची उपस्थिती होती.



स्तनाच्या कर्करोगाबाबत महिलांना मार्गदर्शन करताना डॉ. कोपीकर. सोबत मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया, डॉ. बुशेरी.

फिनोलेक्स देणार मेमोग्राफी मशीन

फिनोलेक्स इंडस्ट्रिज लिमिटेड आणि मुकुल माधव फाऊंडेशन यांच्या संयुक्त प्रयत्नातून चिरायू हॉस्पिटल येथे स्त्रियांच्या स्तनाच्या कर्करोगाचे निदान केंद्र सुरू करण्याचे प्रयत्न सुरू आहेत आणि यासाठी लागणारे मेमोग्राफी मशीन फिनोलेक्स इंडस्ट्रिज लिमिटेडतर्फे प्रदान करण्यात येणार आहे. फिनोलेक्स इंडस्ट्रिज लिमिटेड व मुकुल माधव फाऊंडेशन गेल्या ५-६ वर्षांपासून, दरवर्षी रत्नागिरी व आजूबाजूच्या गावात प्राथमिक आरोग्य शिबीर आयोजित करीत आहेत. दरवर्षी संस्था दोन आरोग्य शिबिरे घेत आहे. यावेळी होणार ११ व्या प्राथमिक आरोग्य शिबिरात कर्करोग निदान शिबिराचा समावेश करून, जास्तीत जास्त महिलांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करीत आहेत.